शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

**शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.**

दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

## सूचना

## भारत सरकारची महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन 2019–20

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०१९ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

### किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखांपेक्षा अधिक नसावे.

४. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये केंद्र शासनाकडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय. एफ. एस. सी. कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच नमूद बँक खाते क्रमांक हा त्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न (link) असणे आवश्यक आहे, ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्याच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे सोईचे होईल.

५. एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

६. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जॉईंट खाते नसावे.

७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.

### अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी) :

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **३१/१०/२०१९** आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile Merit List मध्ये समावेश असेल, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठीचे अर्ज ऑनलाईन भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

४. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Application ID प्राप्त होईल. हा Application ID वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर Application ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा Application ID

विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे.

५. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

६. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत महाविद्यालयात पुढील कार्यवाहीकरिता सादर करावीत.

७. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

**टीप :** विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत श्री. डी.एन्. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

प्रभारी प्राचार्या